# महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या.,नाशिक

रजि.ऑफिस'आदिवासी विकास भवन', २ रा मजला, [illegible] गडकरी चौक,जुना आग्रा रोड, नाशिक - ४२२ ००२.

फोन नंबर (०२५३)२५७९७८२, २५७६८६० फॅक्स (०२५३) २५७६८६०.

Web- www.mahatdc.com, mail- [illegible]@gmail.com


जा.क्र.आविम/विप/जीएसटी/दरपत्रक/2049/२०२४

दिनांक- ३०/०९/२०२४.

विषय - आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील GST चे संपुर्ण कामकाजासाठी सनदी लेखापाल, यांची नियुक्ती करणेसाठी दरपत्रक व तांत्रिक लिफाफे मागविणेबाबत

महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळाची स्थापना सहकार कायदा १९६० अन्वये करण्यात आलेली आहे. महामंडळाचा नोंदणी क्रमांक. PNA/GNL(A)-१ आहे. महामंडळाचा आयकर कायद्यानुसार PAN No. AAGAM४१४३F आहे व TAN No. NSKM००८२१C आहे. महामंडळाचे उत्पन्न आयकर कायद्याच्या कलम १० (२६ब) नुसार आयकर मुक्त आहे.

GST कायदा हा माहे जुलै, २०१७ पासुन लागु झाला आहे. त्यानुसार GST/GST TDS रिटर्न दाखल करणे गरजेचे आहे. याकरीता GST संबंधीचे संपुर्ण कामकाज व मार्गदर्शन करणेकरीता सनदी लेखापाल यांची नियुक्ती होणे आवश्यक आहे.

करीता दिनांक २०/०८/२०२४ रोजीच्या संचालक मंडळ सभेत आयत्या वेळेचा मंजुर पारीत ठराव क्र.३ नुसार आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील GST संबंधीचे कामकाज व GST बाबत विवरणपत्रके निर्धारीत वेळेत भरणा करणेकामी शासनाचे निर्देश आहेत.त्यानुसार GST चे कामकाजासाठी स्थानिक सनदी लेखापाल यांचेकडुन दरपत्रक मागवुन खालीलप्रमाणे कामकाज करून घेणेकरीता वार्षिक फी किंवा कामकाजानुसार फी बाबत आपले तपशिलवार दर मागविण्यात येत आहेत.

| अ.नं. | तपशिल |
|---|---|
| अ | नियमित कामकाज |
| १. | जीएसटीचे कामकाज करणे. प्रती महिना जीएसटी भरणा करणे व ९ सी वार्षीक रिटर्न सादर करणे. |
| २. | महामंडळाचे सन २०२४-२०२५ चे जीएसटी विवरणपत्र वेळेत सादर करणे. |

| | |
|---|---|
| ब | महामंडळास जीएसटी बाबत अद्यावत माहिती देणे व वेळोवेळी आवश्यक असल्यास सल्ला/ मत देणे. |
| क | जीएसटी संबधित विभागांकडून पत्रव्यवहार केला जात असेल तर त्यावेळी महामंडळाचा प्रतिनिधी म्हणून महामंडळाची बाजू मांडण्यासाठी समक्ष उपस्थित राहणे, तसेच त्याबाबत आवश्यक तो पत्रव्यवहार करणे. |
| ड | म.रा.सहकारी आदिवासी विकास महामंडळाचे जीएसटी कायद्यानुसार आर्थिक वर्षनिहाय जीएसटी रिटर्न दाखल करणे. (एका आर्थिक वर्षाकरीता) |

वरील प्रमाणे कामकाजासाठी सोबत जोडलेल्या अटी/शर्ती मंजूर असल्यास दरपत्रक **दिनांक.०७/१०/२०२४ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत** सिलवंद लिफाफ्यात कार्यालयात पाठविण्यात यावे.

सोबत- १) परिशिष्ट अ व ब,

२) निविदा अटी/शर्ती.

(लीना बनसोड, भा.प्र.से.)

व्यवस्थापकीय संचालक

म.रा.सह.आदिवासी विकास महामंडळ मर्यादित.,

नाशिक

# महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या.,नाशिक

रजि.ऑफिस"आदिवासी विकास भवन", २ रा मजला, रामगणेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक - ४२२ ००२.

फोन नंबर (०२५३)२५७१७८२, २५७६८६० फॅक्स (०२५३) २५७६८६०.

Web- www.mahatdc.com, mail- msctdcmkt@gmail.com


---

## परिशिष्ट अ

### तांत्रिक बाबींची माहिती

**विषय-** आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील GST चे संपुर्ण कामकाजासाठी सनदी लेखापाल ,यांची नियुक्ती करणेसाठी दरपत्रक मागविणेबाबत

| अ.क्र. | तपशिल | |
|---|---|---|
| १. | सनदी लेखापाल/सनदी लेखापाल फर्मचे संपूर्ण नांव | |
| २. | संपूर्ण पत्ता | |
| ३. | दूरध्वनी/भ्रमणध्वनी क्रमांक | |
| ४. | ई-मेल. | |
| ५. | प्रोप्रायटर/भागीदार | |
| ६. | फर्म/मेंबरशिप क्रमांक | |
| ७. | पॅन क्रमांक | |
| ८. | जी.एस.टी. क्रमांक. | |

दरपत्रक धारकाचे नांव व स्वाक्षरी (शिक्क्यासह)

नाशिक.

दिनांक-

## महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या.,नाशिक

रजि.ऑफिस"आदिवासी विकास भवन", २ रा मजला, रामनवेश गडकरी चौक, जुना आग्रा रोड, नाशिक - ४२२ ००२.

फोन नंबर (०२५३)२५७१७८२, २५७६८६० फॅक्स (०२५३) २५७६८६०.

Web-www.mahatdc.com,mail- msctdcnsk@gmail.com, msctdcfinance@gmail.com


### परिशिष्ट व

### दरपत्रक बाबीची माहिती

**विषय- आर्थिक वर्ष २०२४-२५ मधील GST चे संपुर्ण कामकाजासाठी सनदी लेखापाल यांची नियुक्ती करणेसाठी दरपत्रक मागविणेबाबत**

| अ.नं. | कामांचा तपशिल | दर रुपये. |
|---|---|---|
| अ | **नियमित कामकाज** | |
| १. | जीएसटीचे कामकाज करणे. प्रती महिना जीएसटी भरणा करणे व ९ सी वार्षीक रिटर्न सादर करणे. | |
| २. | महामंडळाचे सन २०२४-२०२५ चे जीएसटी विवरणपत्र वेळेत सादर करणे. | |
| ब | महामंडळास जीएसटी बाबत अद्यावत माहिती देणे व वेळोवेळी आवश्यक असल्यास सल्ला/ मत देणे. | |
| क | जीएसटी संबधित विभागांकडून पत्रव्यवहार केला जात असेल तर त्यावेळी महामंडळाचा प्रतिनिधी म्हणून महामंडळाची बाजू मांडण्यासाठी समक्ष उपस्थित राहणे, तसेच त्याबाबत आवश्यक तो पत्रव्यवहार करणे. | |
| ड | जीएसटी कायद्यानुसार आर्थिक वर्षनिहाय जीएसटी रिटर्न दाखल करणे. (एका आर्थिक वर्षाकरीता) | |

दरपत्रक धारकाचे नांव व स्वाक्षरी(शिक्क्यासह)

नाशिक.

दिनांक-

## परपत्रकाच्या अटी / शर्ती

१. इन्स्टीट्युट ऑफ चार्टर्ड अकौंटंट ऑफ इंडियाचे सभासद असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे. (सोबत छायाप्रत जोडणे)

२. प्रमाणपत्र धारक सभासदांचेवर इन्स्टीट्युट ऑफ चार्टर्ड अकौंटंट ऑफ इंडिया यांनी कुठल्याही प्रकारची कार्यवाही केलेली नसावी. तसेच अशा सनदी लेखापालावरील तक्रारी असल्यास त्यांची निवीदा विचारात घेतले जाणार नाही.

३. निवीदाधारक फेलो चार्टर्ड अकौंटंट असावा.

४. निविदाधारकाकडे मनुष्यबळ कमीत कमी ५ कर्मचारी असावेत.

५. निविदाधारकाकडे व्यवसायकर व पॅन नंबर असणे आवश्यक आहे. (सोबत छायाप्रती जोडणे)

६. निविदाधारकास शासकीय / निमशासकीय संस्थेकडे काम केल्याचा एक वर्षाचा अनुभव असावा.

७. निवीदाधारक यांनी कार्यालयातून दस्तऐवज देणे / घेणेसाठी कार्यालयाने कळविले प्रमाणे कर्मचारी पाठविणे आवश्यक राहील. (Door Step Service)

८. जीएसटी कायद्यांतर्गत होणा-या सुधारणा वेळीच अपडेट करुन अद्यावत माहिती लेखी स्वरुपात देणे.

९. जीएसटी बाबतीत महामंडळाचे सुधारीत रिटर्न व पत्रव्यवहार करावा लागल्यास त्या बद्दलचे शुल्क अदा केले जाणार नाही.

१०. कोणत्याही कारणास्तव निविदा मंजुर/ नामंजूर करण्याचा, उपरोक्त अटींमध्ये बदल करण्याचा व तसेच नव्याने काही अटींचा करारनाम्यामध्ये समावेश करावयाचा अधिकार मा. व्यवस्थापकीय संचालक यांना आहे.

११. नियमानुसार लागु असलेल्या दराने आयकर (TDS) कपात करण्यात येईल.

( )

निविदा धारकाची सही